मंगळवार दि. २१ जुलै २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३२० वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886
https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

जवेरनहता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

## युवकांनी आता रस्त्यावर उतरून व्यवस्थेला जाब विचारण्याची वेळ- अरविंद देशमुख

**जालना - प्रतिनिधी**

दिल्लीतील जंतर-मंतर हे लोकशाहीतील अन्यायाचे एक जिवंत प्रतीक बनले आहे. ज्येष्ठ समाजसेवी सोनम वांगचूक यांच्या समर्थनार्थ एकत्रित आलेल्या विद्यार्थ्यांवर आणि तरुणांवर ज्या प्रकारे अमानवीय बळाचा वापर करण्यात येत आहे, त्याने देशातील सुज्ञ नागरिकांच्या मनात संतापाची लाट निर्माण केली आहे. लोकशाहीत प्रत्येक नागरिकाला शांततेने आंदोलन करण्याचा, सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारण्याचा आणि आपल्या मागण्या मांडण्याचा घटनात्मक अधिकार आहे. मात्र, या अधिकाराचा वापर करणाऱ्या तरुणांवर ज्या पद्धतीने लाठीमार आणि क्रूर दडपशाही केली जात आहे, ती लोकशाहीच्या मूल्यांना पूर्णपणे पायदळी तुडवणारी असून, या घटनेचा आपण तीव्र निषेध करतो. पक्ष, जात, धर्म न पाहता प्रत्येक युवकाने या विरोधात रस्त्यावर उतरण्याची हीच योग्य वेळ असून जालन्यातही लवकरच व्यापक स्वरूपातील सामाजिक आंदोलन उभारण्यात येणार असल्याची माहिती मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख यांनी दिली.

यासंदर्भात प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात अरविंद देशमुख यांनी म्हटले आहे की, मीशालेय आणि महाविद्यालयीन काळापासून चळवळी आणि आंदोलने पाहत लहानाचा मोठा झालेला असून, आंदोलन चिरडण्याची असली दडपशाही आणि आपण पाहिलेली नाही. आजचा तरुण हा देशातील बदलत्या राजकीय आणि सामाजिक परिस्थितीमुळे अस्वस्थ आहे. एक काळ असा होता की, आंदोलने ही सर्वसामान्यांच्या न्यायासाठी, विकासासाठी आणि हक्कांसाठी लढली जात असत. मात्र, आजच्या काळात कोणतेही राजकीय पक्ष, जात, मंदिर-मस्जिद किंवा धार्मीक भिंतींच्या पलीकडे जाऊन, व्यवस्थेला थेट जाब विचारण्याची गरज निर्माण झाली आहे.

देशाचा तरुण हा राष्ट्राचा आधारस्तंभ आहे, त्याच्या संयमाची परीक्षा घेणे आता थांबवा, शांततेने आंदोलन करणाऱ्या तरुणांवर गुन्हेगारासारखी कारवाई *(पान २ वर)*

**जालन्यातही लवकरच आंदोलन पेटणार; आवाज बुलंद करा; ही तर क्रांतीची ठिणगी**

दिल्लीतील दडपशाहीने आज एका अशा सीमारेषेला स्पर्श केला आहे, जिथे शांत बसणे म्हणजे अन्यायाशी तडजोड करणे होय. जेव्हा प्रश्न विचारणे हा गुन्हा ठरवला जातो, तेव्हा लोकशाहीचा श्वास कोंडला जातो. आपण हे विसरत नाही पाहिजे की, लोकशाहीत शांततेने न्याय मिळत नसेल, तर आवाज उठवणे हीच क्रांतीची सुरुवात असते! लवकरच या विरोधात जालन्यातही सामाजिक पातळीवर आंदोलन उभारण्यात येणार आहे. त्यासाठी युवक आणि विद्यार्थ्यांनी अरविंद देशमुख (९७६३५१३३८८), अशोक पडूळ (९७६४७०३६७६) यांच्याशी संपर्क साधावा. लढाई कोणत्याही जातीची, धर्माची किंवा पक्षाची नाही, तर ती आहे आपल्या हक्कांची आणि सन्मानाची. तरुणांच्या संयमाचा अंत पाहणे थांबवा. व्यवस्थेला जाब विचारणे हा आमचा अधिकार आहे आणि तो आम्ही बजावणारच! एकजूट व्हा. आवाज उठवा, अशी साद अरविंद देशमुख यांनी घातली आहे.



आज दिनांक २० सोमवार आनंदी स्वामी यांना महादेव पार्वती यांचे रूप दिले असून हर हर महादेवाच्या गजरात मंदिर दुमदुमले
**छायाचित्र किरण खानापुरे**

## जिल्ह्यात २२ जुलै ते २ ऑगस्टदरम्यान 'समाधान शिबिर' अभियान

**जालना - प्रतिनिधी**

शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान' अंतर्गत राज्यभर २२ जुलै ते २ ऑगस्ट, २०२६ या कालावधीत प्रत्येक विधानसभा मतदारसंघात 'समाधान शिबिर' आयोजित करण्यात निर्देश देण्यात आले आहेत. मुख्यमंत्री यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या प्रथम जयंतीचे औचित्य साधुन या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जालना जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघांमध्ये शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. प्रत्येक विधानसभा मतदारसंघासाठी एका वरिष्ठ अधिकाऱ्याची मुख्य नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, शिबिरांचे नियोजन, समन्वय, अंमलबजावणी, पर्यवेक्षण आणि अहवाल सादर करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

जालना जिल्ह्यातील समाधान शिबिरांचे वेळापत्रक परतूर-मंठा विधानसभा मतदारसंघ : २२ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता गजानन मंगल कार्यालय, परतूर येथे शिबिर होणार असून उपविभागीय अधिकारी श्री. प्रभाकर गायकवाड हे मुख्य नोडल अधिकारी असतील.

भोकरदन-जाफराबाद विधानसभा मतदारसंघ : २२ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता समृध्दी लॉन्स, भोकरदन येथे शिबिराचे आयोजन ।करण्यात आले असून उपविभागीय अधिकारी श्रीमती सुकेशिनी कांबळे-पगारे यांच्याकडे नोडल अधिकारी म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. घनसावंगी विधानसभा *(पान २ वर)*

## विपश्यना केंद्राच्या प्रस्ताव संदर्भात शिवसेना नगरसेवकांची जिल्हाधिकाऱ्याकडे धाव

### आयुक्तांना, तातडीने पत्र काढणार जिल्हाधिकाऱ्यांचे आश्वासन

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील बहुचर्चित विपश्यना केंद्र (भिमपार्क) उभारणीचा विषय जालना महानगर पालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या विषयपत्रिकेत समाविष्ट करण्यात आला नसल्याने शिवसेनेच्या नगरसेवकांनी तीव्र नाराजी व्यक्त करत सभेत

सभागृहात आक्रमक भूमिका घेतली. शहराच्या विकासाशी आणि सामाजिक दृष्टिकोनातून महत्त्वाच्या असलेल्या या विषयाकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप करत



नगरसेवकांनी थेट महानगरपालिका आयुक्त अंजली शर्मा यांच्याकडे जाब विचारला.

सर्वसाधारण सभेदरम्यान नगरसेवक निखिल पगारे, नगरसेवक अमोल ठाकूर, नगरसेविका दर्शना खोतकर, नगरसेवक दुर्गेश काठोटीवाले, नगरसेवक संजय डुकरे आणि नगरसेवक अश्विन आंबेकर यांनी एकमुखाने भीम पार्क व विपश्यना केंद्राचा विषय सभेत का घेण्यात आला नाही, असा प्रश्न उपस्थित करत प्रशासनावर जोरदार टीका केली. या विषयावर वारंवार पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

सभेनंतर शिवसेनेच्या शिष्टमंडळाने थेट जिल्हाधिकारी कार्यालय गाठून जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेतली. यावेळी आ.अर्जुनराव खोतकर यांच्या शिफारशीनुसार मा.ना.संजयजी शिरसाट मंत्री सामाजिक न्याय महाराष्ट्र राज्य* यांनी भीम पार्क व विपश्यना केंद्राच्या प्रस्तावासंदर्भातील पत्र जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर केले. या पत्राद्वारे तातडीने प्रस्ताव तयार करून मंजुरीसाठी पुढील प्रक्रिया सुरू करण्याची मागणी करण्यात आली.

यावेळी विरोधी पक्षनेते कमलेश खरे, नगरसेवक निखिल पगारे, नगरसेवक अश्विन आंबेकर, नगरसेवक दुर्गेश काठोटीवाले, नगरसेवक संजय डुकरे, सामाजिक कार्यकर्ते किशोर पांगारकर, सामाजिक कार्यकर्ते दिनेश भगत यांच्यासह अनेक पदाधिकारी *(पान २ वर)*

## रक्तदानाचा महायज्ञ! मुख्यमंत्री फडणवीसांच्या वाढदिवसानिमित्त घनसावंगीत भव्य शिबिर

### अवास्तव खर्चाला फाटा, समाजसेवेला प्राधान्य; घनसावंगीत महारक्तदान शिबिर

**घनसावंगी - प्रतिनिधी**





मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यभर राबविण्यात येत असलेल्या महारक्तदान संकल्प आणि सेवा सप्ताह उपक्रमांतर्गत घनसावंगी विधानसभा मतदारसंघात मंगळवारी रेणुका नगर, देवी दहेगाव येथील समृद्धी साखर कारखाना परिसरात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन तथा भाजप नेते सतीश घाटगे यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या शिबिरात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन रक्तदान करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस वाढदिवसाचे औचित्य साधून कोणत्याही प्रकारचा अवास्तव खर्च न करता, समाजोपयोगी आणि विधायक कामांना प्राधान्य देण्याचे आवाहन भाजपा प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी आवाहन केले. तसेच त्यांच्या नेतृत्वाखाली महा रक्तदानाचा संकल्प करण्यात आला आहे. हा संकल्प पूर्ण करण्यासाठी सतीश घाटगे यांच्या मार्गदर्शनाखाली घनसावंगी विधानसभा मतदारसंघात भाजपच्या तिन्ही मंडळासाठी भव्य रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले आहे. रक्तदान शिबिरांसोबतच वृक्षारोपण मोहीम देखील राबविण्यात येणार असल्याची माहिती सतीश घाटगे यांनी दिली आहे.

## मातोश्री पाणंद रस्ते योजना नुसतीच नावाला : शेतकऱ्यांनी दाखवले एकीचे बळ

### शासकीय अनास्था : शेतकऱ्यांनी उभारला श्रमदानातून तीन किमीचा पाणंद रस्ता

**दत्ता देशमुख**

अकोलादेव शासन आणि प्रशासनाच्या उदासीन कारभाराला कंटाळून अखेर अकोलादेव येथील शेतकऱ्यांनी एकीचे बळ दाखवत स्वतःचा रस्ता स्वतःच तयार केला आहे. बुटखेडा रोड ते गणपती मंदिर दरम्यानचा तब्बल तीन किलोमीटर लांबीचा पानंद रस्ता शेतकऱ्यांनी लोकसहभाग आणि श्रमदानातून पूर्ण केला आहे. सरकार देत नाही आणि प्रशासन ऐकत नाही अशी स्थिती निर्माण झाल्यामुळे



शेतकऱ्यांनी घेतलेल्या या निर्णयामुळे शासकीय यंत्रणेच्या नाकर्तेपणावर सर्वत्र संताप व्यक्त केला जात आहे.

शासनाकडून शेतकऱ्यांच्या शेतातील रस्त्यांसाठी पाणंद रस्ते योजना राबवली जात असल्याचा मोठा गाजावाजा केला जातो. मात्र, अकोलादेव येथील डाक बंगला बुटखेडा रोड ते गणपती मंदिर या रस्त्याची परिस्थिती अत्यंत दयनीय झाली होती. पावसाळ्यात या रस्त्यावरून चालणेही कठीण होत असल्याने शेतकऱ्यांना पिके बाजारात नेणे आणि शेतात जाणे अशक्य झाले होते. हा रस्ता मंजूर व्हावा यासाठी येथील शेतकऱ्यांनी अनेक महिने शासन दरबारी शेकडो खेटे मारले. परंतु, अधिकाऱ्यांच्या अनास्थेमुळे आणि प्रशासकीय दिरंगाईमुळे या योजनेचा कोणताही लाभ शेतकऱ्यांना मिळाला नाही. अखेर शासनाची *(पान २ वर)*


## जुना जालना शनी मंदिर चौकात वाहतूक कोंडीचा कहर; आनंदी स्वामी महाराज यात्रा महोत्सवामुळे परिस्थिती गंभीर

### रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी पार्किंगमुळे मार्ग अरुंद; १-२ पार्किंग नियम लागू करून कायमस्वरूपी वाहतूक नियोजनाची वाहनधारकांची मागणी

**जालना । प्रतिनिधी**

जुना जालना परिसरातील शनी मंदिर चौकात रविवारी दुपारी साडेबारा ते दीड वाजण्याच्या सुमारास मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. सध्या आनंदी स्वामी महाराज यात्रा महोत्सव सुरू असल्याने या परिसरात भाविक, नागरिक आणि वाहनांची मोठी गर्दी होत आहे. मात्र, त्यानुसार वाहतूक नियोजन करण्यात आले नसल्याने वाहनचालकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत असल्याची भावना व्यक्त होत आहे.





छाया : किरण खानापुरे

शनी मंदिर चौक हा जुना जालन्यातील अत्यंत वर्दळीचा चौक असून या मार्गावरून दिवसभर चारचाकी, दुचाकी, रिक्षा तसेच मालवाहू वाहनांची मोठ्या प्रमाणात ये-जा असते. यात्रा महोत्सवामुळे भाविकांची गर्दी वाढल्याने दुपारच्या वेळेत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. काही काळ वाहने अक्षरशः जागेवरच अडकून पडल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, या चौकातील वाहतूक कोंडी ही केवळ यात्रेपुरती मर्यादित नसून ती नित्याचीच समस्या बनली आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना बेशिस्तपणे उभ्या करण्यात येणाऱ्या वाहनांमुळे रस्त्याची रुंदी मोठ्या प्रमाणात कमी होते.

परिणामी समोरासमोर दोन मोठी वाहने आल्यास वाहतूक पूर्णपणे ठप्प होते. व्यापारी, वाहनधारक आणि नागरिकांनी या ठिकाणी कायमस्वरूपी वाहतूक नियोजन करण्याची मागणी केली आहे. रस्त्यावर १-२ पार्किंग व्यवस्था लागू करून एका बाजूला ठराविक दिवशी आणि दुसऱ्या बाजूला पर्यायी दिवशी पार्किंगची परवानगी दिल्यास रस्ता तुलनेने मोकळा राहू शकतो, असे मत वाहनधारकांनी व्यक्त केले. यासोबतच पार्किंग नियमांचे काटेकोर पालन होण्यासाठी वाहतूक शाखेचे कर्मचारी पूर्णवेळ नियुक्त करावेत, अशीही मागणी होत आहे.

विशेषतः यात्रा महोत्सव, धार्मिक कार्यक्रम, उत्सव किंवा मोठ्या गर्दीच्या दिवसांमध्ये शनी मंदिर चौकात वाहतूक पोलिसांची नियमित नियुक्ती करणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. योग्य नियोजन, पार्किंगवर नियंत्रण आणि सतत देखरेख ठेवल्यास वाहतूक कोंडीची समस्या मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते, असा विश्वासही नागरिकांनी व्यक्त केला.

दरम्यान, या समस्येकडे वाहतूक शाखा आणि संबंधित प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन प्रभावी उपाययोजना कराव्यात, अन्यथा आगामी सण-उत्सवांच्या काळात वाहतूक कोंडी अधिक गंभीर होण्याची शक्यता नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

वाहनधारकांच्या वाढत्या मागणीमुळे आता प्रशासन कोणती ठोस पावले उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# संपादकीय....

## संघर्षाच्या घोषणेतून २०२९ ची मोर्चेबांधणी

जालना येथे वाढदिवसानिमित्त आयोजित अभिष्टचिंतन सोहळ्यात खासदार डॉ. कल्याण काळे यांनी केलेले भाषण हे केवळ शुभेच्छा स्वीकारण्यापुरते मर्यादित राहिले नाही. त्यांच्या भाषणातून आगामी राजकीय संघर्षाची दिशा, संघटनात्मक तयारी आणि निवडणूकपूर्व रणनीती यांचे स्पष्ट संकेत मिळाले. ''शेतकरी, गरीब आणि जनतेच्या हक्कांसाठी संघर्षाची तयारी ठेवा'' हा त्यांचा संदेश केवळ कार्यकर्त्यांसाठी नव्हता, तर राज्यातील सध्याच्या राजकीय परिस्थितीवर भाष्य करणारा होता. डॉ. काळे यांनी महायुती सरकारवर विरोधी पक्षांच्या लोकप्रतिनिधींना विकासनिधीपासून दूर ठेवण्याचा आरोप केला. हा आरोप नवीन नाही. राज्यातील अनेक विरोधी पक्षांचे आमदार व खासदार अशा प्रकारच्या तक्रारी सातत्याने करत आले आहेत. दुसरीकडे, सत्ताधारी पक्ष या आरोपांचे खंडन करत निधी वाटप हे नियमांनुसार होत असल्याचा दावा करतो. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर राजकीय आरोप-प्रत्यारोपांपेक्षा वस्तुनिष्ठ आकडेवारीत आणि पारदर्शक प्रशासनात शोधावे लागेल. भाषणातील दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे संघर्षाची हाक. लोकशाही व्यवस्थेत आंदोलने, मोर्चे आणि जनआंदोलने ही विरोधी पक्षांची वैध आणि घटनात्मक साधने आहेत. मात्र संघर्ष हा केवळ राजकीय शक्तिप्रदर्शनापुरता मर्यादित राहता कामा नये. शेतकऱ्यांचे प्रश्न, बेरोजगारी, सिंचन, पाणीटंचाई, शिक्षण, आरोग्य आणि स्थानिक विकास यांसारख्या मूलभूत विषयांवर केंद्रित झाल्यासच अशा आंदोलनांना व्यापक जनसमर्थन मिळू शकते. २०२९ च्या निवडणुकीबाबत व्यक्त केलेला विश्वास हा प्रत्येक राजकीय पक्षाच्या रणनीतीचा भाग असतो. कोणताही पक्ष विजयाचा दावा करतो आणि कार्यकर्त्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न करतो. मात्र अंतिम निर्णय मतदारांचाच असतो. निवडणुका घोषणांनी नव्हे, तर गेल्या काही वर्षांतील कामगिरी, विश्वासार्हता आणि जनतेशी असलेल्या संवादावर जिंकल्या जातात.

डॉ. काळे यांनी भाजपमध्ये जाण्याच्या चर्चांना स्पष्ट शब्दांत फेटाळून लावत जालना लोकसभा मतदारसंघातूनच पुन्हा निवडणूक लढविणार असल्याचे जाहीर केले. यामुळे गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या राजकीय चर्चांना त्यांनी पूर्णविराम देण्याचा प्रयत्न केला आहे. अशा स्पष्ट भूमिकेमुळे त्यांच्या कार्यकर्त्यांमधील संभ्रम दूर होण्यास मदत होऊ शकते.

भाषणातील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे बूथस्तरावर संघटन मजबूत करण्याचे आवाहन. आधुनिक निवडणुकीत सोशल मीडियावरील प्रचाराइतकेच बूथ व्यवस्थापन, मतदार यादीचे पुनरावलोकन आणि स्थानिक पातळीवरील सक्रिय कार्यकर्ते हे विजयाचे निर्णायक घटक ठरतात. त्यामुळे संघटनात्मक बळकटीवर दिलेला भर हा राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा मानला जातो. तथापि, केवळ सत्ताधाऱ्यांवर टीका करून विरोधी पक्षाची भूमिका पूर्ण होत नाही. जनतेसमोर पर्यायी विकास आराखडा, रोजगार निर्मितीचे ठोस धोरण, शेतीसाठी उपाययोजना आणि स्थानिक प्रश्नांवरील कृती आराखडा मांडणे तितकेच आवश्यक आहे. जनतेला आता घोषणांपेक्षा परिणामकारक कृतीची अपेक्षा आहे. आज महाराष्ट्रातील राजकारणात संघर्षाचे वातावरण आहे. सत्ताधारी आणि विरोधक दोघेही एकमेकांवर आरोप करत आहेत. मात्र या राजकीय संघर्षाच्या केंद्रस्थानी सामान्य नागरिकांचे प्रश्न राहणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या, वाढती बेरोजगारी, महागाई, ग्रामीण पायाभूत सुविधा, शहरांचा विस्कळीत विकास आणि शिक्षण-आरोग्याच्या समस्या या केवळ भाषणांचे विषय न राहता प्रत्यक्ष कृतीतून सोडवाव्या लागतील. डॉ. कल्याण काळे यांच्या भाषणाने महाविकास आघाडीच्या आगामी राजकीय भूमिकेची दिशा निश्चितच स्पष्ट केली आहे. आता या संघर्षाच्या हाकेला जनतेचा किती प्रतिसाद मिळतो आणि या घोषणांचे रूपांतर प्रत्यक्ष जनआंदोलनात व विकासाच्या ठोस कार्यक्रमात होते का, हेच येत्या काळात निर्णायक ठरणार आहे. कारण लोकशाहीत शेवटी विजय हा घोषणांचा नव्हे, तर जनतेचा विश्वास जिंकणाऱ्याचाच होतो.

## डोंबिवलीतील डॉक्टरांवरील हल्ल्याचा टेंभुर्णीत तीव्र निषेध; काळी फीत लावून डॉक्टरांनी नोंदवला विरोध




**दत्ता देशमुख**

मुंबई महानगर परिसरातील डोंबिवली येथे डॉक्टरांवर झालेल्या भ्याड हल्ल्याचे तीव्र पडसाद उमटत आहेत. या घटनेच्या निषेधार्थ टेंभुर्णी डॉक्टर असोसिएशनने तीव्र संताप व्यक्त केला असून या भ्याड हल्ल्याचा जाहीर निषेध केला आहे.वैद्यकीय सेवा देणाऱ्या डॉक्टरांवर होणारे हिंसक हल्ले अत्यंत चिंताजनक असून, डॉक्टरांवरील हिंसा कदापि सहन केली जाणार नाही, अशी भूमिका असोसिएशनने घेतली टेंभुर्णी डॉक्टर असोसिएशनचे सर्व डॉक्टर या घटनेचा निषेध म्हणून काळी फीत लावून रुग्णसेवा करत आहेत. डॉक्टरांचे मानसिक खच्चीकरण थांबवण्यासाठी आणि त्यांना सुरक्षित वातावरणात काम करता यावे यासाठी शासनाने ठोस पावले उचलण्याची गरज असल्याचे असोसिएशनने म्हटले आहे.डॉक्टरांच्या प्रमुख मागण्या:कठोर कायद्याची अंमलबजावणी: डॉक्टरांच्या सुरक्षिततेसाठी असलेल्या कायद्यांची अत्यंत कठोरपणे अंमलबजावणी व्हावी, ही आमची ठाम मागणी आहे.सुरक्षित वातावरण: ''डॉक्टर सुरक्षित... समाज सुरक्षित या सूत्राचा आदर ठेवून रुग्णालयांमध्ये वैद्यकीय कर्मचाऱ्यांना पुरेशी सुरक्षा व्यवस्था मिळावी.

**रुग्णांचे प्राण वाचवण्यासाठी अहोरात्र झटणाऱ्या डॉक्टरांवर अशा प्रकारे हल्ले होणे ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे शासनाने डॉक्टरांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने कठोर कायदे अंमलात आणायला हवेत.**

**डॉ. असोसिएशन टेंभुर्णी**

# समाजवादी चळवळीतील शेवटचा तारा निखळला

ज्येष्ठ समाजवादी नेते, पुरोगामी विचारवंत, युवक क्रांती दलाचे संस्थापक, गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष, माजी आमदार आणि अभ्यासू लेखक डॉ. कुमार सप्तर्षी यांचे १८ जुलै रोजी वयाच्या ८५ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय आणि वैचारिक क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. समाजवादी विचारांना आयुष्यभर निष्ठेने वाहून घेतलेल्या या लढवय्या व्यक्तिमत्त्वाच्या जाण्याने समाजवादी चळवळीतील एक तेजस्वी पर्व संपल्याची भावना अनेकांच्या मनात आहे.

डॉ. कुमार सप्तर्षी हे केवळ राजकारणी नव्हते; ते प्रभावी वक्ते, सखोल अभ्यासू विचारवंत, निर्भीड लेखक, कुशल संघटक आणि सामाजिक परिवर्तनासाठी आयुष्य वेचलेले कार्यकर्ते होते. समाजातील विषमता, अन्याय, भ्रष्टाचार आणि जातीयतेविरुद्ध त्यांनी सातत्याने आवाज उठवला. लोकशाही, समाजवाद, समता आणि संविधानिक मूल्यांवर त्यांची दृढ श्रद्धा होती. आपल्या लेखणीतून, व्याख्यानांतून आणि चळवळींतून त्यांनी हजारो युवकांना वैचारिक दिशा दिली. त्यांच्या प्रेरणेने अनेक तरुण युवक क्रांती दलात सहभागी झाले. त्यांपैकी अनेकांनी पुढे आमदार, खासदार, मंत्री आणि सामाजिक कार्यकर्ते म्हणून नावलौकिक मिळवला.

२१ ऑगस्ट १९४१ रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील खेड या छोट्याशा गावात त्यांचा जन्म झाला. प्राथमिक शिक्षण राशीन येथे, तर माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण नगर येथे झाले. विद्यार्थी दशेतच त्यांना वाचनाची गोडी लागली. संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाच्या काळात नगरमध्ये येणाऱ्या नेत्यांची भाषणे ते आवर्जून ऐकत असत. त्या चळवळीतील विचारांचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर खोल प्रभाव पडला. उच्च शिक्षणासाठी त्यांनी पुण्यातील बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेतला. १९६४ मध्ये ते महाविद्यालयाचे जनरल सेक्रेटरी (जी.एस.) म्हणून निवडून आले. याच काळात त्यांना अभिनेते आणि समाजवादी कार्यकर्ते निळू फुले यांचा सहवास लाभला. निळू फुले यांनी त्यांना समाजवादी साहित्य वाचण्यास प्रवृत्त केले आणि डॉ. राममनोहर लोहिया यांच्याशी परिचय करून दिला.

पुढे लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या सहवासाने त्यांच्या विचारांना अधिक व्यापक दिशा मिळाली. त्यांनी जयप्रकाश नारायण यांना गुरुस्थानी मानले. कार्ल मार्क्स, लेनिन, माओ, डेव्हिड थेरो, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचाही त्यांच्या वैचारिक जडणघडणीवर प्रभाव होता.

१९६७ मध्ये त्यांनी युवक क्रांती दलाची स्थापना केली. या संघटनेने महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर आणि सामाजिक न्यायासाठी अनेक प्रभावी आंदोलने उभारली. पुढे जयप्रकाश नारायण यांच्या सूचनेनुसार त्यांनी जनता पक्षात प्रवेश केला आणि आमदार म्हणूनही कार्य केले. माजी पंतप्रधान चंद्रशेखर यांच्याशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते.

डॉ. सप्तर्षी यांनी साहित्य क्षेत्रातही मोलाची भर घातली. येरवडा विद्यापीठातील दिवस हे त्यांचे आत्मचरित्र विशेष गाजले. व्यक्तिरंग, धर्माबद्दल यांसारखी पुस्तके त्यांनी लिहिली. तसेच सत्याग्रही विचारधारा हे मासिक दीर्घकाळ चालवून समाजप्रबोधनाचे कार्य केले. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. आजच्या काळात वैचारिक राजकारण दुर्मिळ होत असताना डॉ. कुमार सप्तर्षी यांच्यासारखा निस्वार्थी, तत्त्वनिष्ठ आणि संघर्षशील नेता काळाच्या पडद्याआड जाणे ही समाजासाठी मोठी पोकळी आहे. त्यांनी जपलेली लोकशाही, समाजवाद, सामाजिक न्याय आणि मानवतेची मूल्ये नव्या पिढीने आत्मसात करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

डॉ. कुमार सप्तर्षी यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय आणि वैचारिक विश्वात कधीही न भरून येणारी पोकळी निर्माण झाली आहे. समाजवादी चळवळीतील अखेरचा तेजस्वी तारा निखळल्याची भावना त्यांच्या जाण्याने अधिक तीव्र झाली आहे.

डॉ कुमार सप्तर्षी यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**श्याम ठाणेदार**
**दौंड, जिल्हा पुणे**

# पालकांनी आपल्या स्वप्नाचे ओझे विद्यार्थ्यांवर टाकू नका - विश्वजित गाताडे

राजापूर १९ ( महादेव गोळवसकर) राजापूर तालुका तेली समाज सेवा संघाच्या वतीने राजापूर तालुक्यातील तेली समाजातील १० - १२ परिक्षा उत्तीर्ण आणि विशेष प्राविण्य मिळविलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा आज, सकाळी १०.०० वाजता राजापूर तालुक्यातील जवाहर चौक येथील मातोश्री सभागृहात आयोजित करण्यात आला होता.विद्धार्थांना सन्मानित व मार्गदर्शन करण्यासाठी प्रमुख पाहुणे व वक्ते म्हणून लांजा - राजापूर तालुका उप विभागीय अधिकारी मा.श्री.विश्वजित गाताडे उपस्थित होते.विद्धार्थांना मार्गदर्शन करताना मी कसा घडलो, ग्रामीण भागातील अडचणींवर मात करत यशाचे शिखर कसे गाठले हे सांगितले.पहिली पासून सातवी पर्यंत खेडेगावात,८ वी ते १० वी खेडेगावात शिक्षण झाले.आई - वडील,शिक्षक यांचे मार्गदर्शन लाभले तर विद्यार्थी यशस्वी होतो.शालेय जीवनातील सर्व स्पर्धा परीक्षांमध्ये प्राविण्य मिळवले आहे.दहावी पर्यंत मराठी माध्यमातून शिक्षण झाले.परिक्षेत ९७ % टक्के गुण मिळविले, विज्ञान शाखेत प्रवेश घेतला ११ वी १२ वी इंग्रजी माध्यमातून शिक्षण सुरू झाले, सुरवातीला थोडाशी अडचण झाली पण पुढे चिकाटीने अभ्यास करून परिक्षेत ८८% टक्के गुण मिळविले.विज्ञान शाखेचा पदवीधर झालो.बी एस सी च्या सांख्यिकी विषयात ९५ % टक्के गुण मिळविले.२०१९ साली पदवीधर झालो.महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेचा अभ्यास सुरू केला.दरम्यान कोरोना प्रादुर्भाव असल्याने परिक्षा पुढे गेली.२०२१ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा दिली.महाराष्ट्र राज्यात १० वा तर इतर मागास प्रवर्गात पहिला आल्याचे सांगितले.२०२२ साली उप जिल्हाधिकारी परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे सांगितले.शिक्षणात आणि नोकरीत नवं नवीन आव्हाने येत आहेत.ती पेलण्यासाठी योग्य मार्गदर्शक , पालक व गुरू जनांची गरज आहे.विद्धार्थांनी आपली आवड ओळखून आपला मार्ग निवडावा.पालकांनी आपल्या स्वप्नांचे ओझे विद्यार्थ्यांवर टाकू नये.त्यांना त्यांच्या कार्याची जाणीव होईल तेव्हाच ते आपल्या कामात यशस्वी होतील असे सांगितले.राजापूर तालुका तेली समाज संघाच्या वतीने १०- १२ आणि स्पर्धा परीक्षांमध्ये भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी वेळ देण्याचे आश्वासन दिले. यावेळी, जिजाऊ संस्थेचे श्री राऊत, रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक श्री मधुकर टिळेकर, रत्नागिरी जिल्हा तेली समाज अध्यक्ष श्री रघुवीर शेलार, सिंधुदुर्ग जिल्हा तेली समाज अध्यक्ष श्री तुकाराम तेली, राजापूर तेली समाज अध्यक्ष श्री विद्याधर राणे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.विद्धार्थांना त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी त्यांच्या पालकांसह सन्मानित करण्यात आले.तुकाराम तेली यांनी उपस्थितांकडून ध्यान धारणा करून घेतली.त्यांनी राजापूर तालुका तेली समाजाच्या विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी मोठी आर्थिक मदत केली आहे.मुदत ठेवीतून मिळणाऱ्या लाभातून श्रुती पावसकर पाच हजार रुपयांचा धनादेश देण्यात आला.श्रावणी रसाळ आणि शिवाली खानविलकर यांना रुपये एक हजार आणि रुपये पंधराशे विभागून देण्यात आले.दंत चिकीत्सक श्री मंचेकर,ॲड पूजा पटेल,शुभ्रा आंब्रे,गार्गी बाकाळकर ,गौरी कुवेस्कर, वेदांत रहाटे ,आदिती कुवेस्कर विशेष प्राविण्य मिळविलेल्या गुणवंतांचा सत्कार करण्यात आला.१० वी १२ वी विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.मागील वर्षाचा आर्थिक ताळेबंद सादर करण्यात आला त्यास उपस्थितांनी मंजुरी दिली.कार्यक्राचे प्रास्ताविक संजय बाकाळकर यांनी केले तर सुत्र संचालन अभिजित तेली यांनी केले.कार्यक्रमास तालुक्यातील तेली समाज बांधव - भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.उपस्थितांकरिता भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.

**महादेव गोळवसकर,**
**राजापूर**
**९८६९४७६२०९**
**ahadeogolvaskar@gmail.com**

# पान १ व ४ वरुन...

## युवकांनी आता...

करणे तातडीने बंद करा, लोकशाहीत प्रश्न विचारणे हा गुन्हा नसून, तो नागरिकांचा मूलभूत अधिकार आहे. हा अधिकार हिरावून घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या प्रत्येक घटकाचा आम्ही तीव्र निषेध करतो.आता वेळ आली आहे एकजूट होण्याची. जर लोकशाही मार्गाने आणि शांततेने न्याय मिळत नसेल, तर हा तरुण आता गप्प बसणार नाही. आंदोलन अधिक तीव्र होईल आणि व्यवस्थेला प्रत्येक अन्यायाचा जाब द्यावा लागेल. हे केवळ एका व्यक्तीचे आंदोलन नसून, देशातील प्रत्येक जागरूक तरुणाच्या आत्मसन्मानाची लढाई आहे, असे अरविंद देशमुख यांनी म्हटले आहे.

देशातील तमाम तरुणांनो, आता पेटून उठण्याची वेळ आली आहे. राजकीय भेदाभेद विसरून, लोकशाही मूल्यांचे जतन करण्यासाठी आणि अन्यायाविरुद्ध ठामपणे उभे राहण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र येणे हीच काळाची गरज आहे. ही दडपशाही आता सहन करण्याच्या पलीकडे गेली आहे.या संघर्षाला अधिक व्यापक स्वरूप देण्यासाठी आणि पुढील धोरण ठरवण्यासाठी तुम्ही रस्त्यावर उतरलेच, पाहिजे असे आवाहन आपण कोणत्याही पक्ष, संघटनेचा पदाधिकारी म्हणून नव्हे तर एक युवक म्हणून करत असल्याचे अरविंद देशमुख म्हणाले.

## जिल्ह्यात २२...

मतदारसंघ : २३ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता नृसिंह मंगल कार्यालय, घनसावंगी येथे शिबिर होणार असून उपविभागीय अधिकारी श्री. उमाकांत पारधी हे नोडल अधिकारी राहतील.

जालना विधानसभा मतदारसंघ : २६ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता मुक्तेश्वर लॉन्स (मनपा), जालना येथे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. उपविभागीय अधिकारी श्री. रामदास दौंड यांची मुख्य नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

बदनापूर-अंबड विधानसभा मतदारसंघ : ३१ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता कृषी उत्पन्न बाजार समिती मागील मैदान, बदनापूर येथे शिबिर होणार असून तहसीलदार श्री. एस. एच. हंडेश्वर यांच्याकडे नोडल अधिकारी म्हणून जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

राज्य शासनाच्या निर्देशानुसार या शिबिरांमध्ये नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याबरोबरच प्रमाणपत्रे, महसूल विषयक सेवा तसेच इतर विभागांच्या सुविधा व इतर विभागांशी संबंधित प्रलंबित प्रकरणांचा निपटारा, अर्ज स्वीकृती, मार्गदर्शन आणि विविध सेवा देण्यात येणार आहेत. जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी या शिबिरांचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

## विपश्यना केंद्राच्या...

उपस्थित होते. शिष्टमंडळाशी चर्चा करताना जिल्हाधिकाऱ्यांनी या विषयाची गंभीर दखल घेतली. ''मी स्वतः महानगरपालिका आयुक्त अंजली शर्मा यांना यासंदर्भात पत्र पाठविणार असून भीम पार्क व विपश्यना केंद्राचा प्रस्ताव लवकरात लवकर तयार करून पुढील कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात येतील,'' असे आश्वासन त्यांनी दिले.

दरम्यान, शिवसेनेच्या नगरसेवकांनी प्रशासनाने शहराच्या विकासाशी संबंधित महत्त्वाच्या विषयांकडे दुर्लक्ष करू नये, अशी भूमिका स्पष्ट केली. भीम पार्क व विपश्यना केंद्राची उभारणी ही जालना शहराच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि पर्यटन विकासासाठी महत्त्वाची असल्याचे सांगत हा प्रस्ताव तातडीने मंजूर करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात करावी, अशी मागणी त्यांनी केली.

जिल्हाधिकाऱ्यांच्या आश्वासनानंतर नगरसेवकांनी समाधान व्यक्त केले असले, तरी लवकरच प्रस्तावाची अंमलबजावणी न झाल्यास तीव्र लोकआंदोलन उभारण्याचा इशाराही शिवसेनेच्या नगरसेवकांनी दिला आहे. आता महानगरपालिका प्रशासन या आश्वासनानंतर किती वेगाने कार्यवाही करते, याकडे जालना शहरवासीयांचे लक्ष लागले आहे

## मातोश्री पाणंद...

ही योजना नुसतीच नावाला उरल्याचे स्पष्ट झाले. प्रशासनाकडून वारंवार निराशा पदरी पडल्याने, शेतकऱ्यांनी कोणावरही अवलंबून न राहण्याचा निर्धार केला. गावातील सर्व शेतकरी एकत्र आले आणि त्यांनी श्रमदानाचा निर्णय घेतला. स्वतः च्या पदरचे पैसे खर्च करून, ट्रॅक्टर आणि आवश्यक साधनांची सोय करत शेतकऱ्यांनी दिवस रात्र घाम गाळला. खडी, मुरूम

शासनाने प्रत्यक्ष जमिनीवर काम करावे आम्ही लोकप्रतिनिधींपासून ते सरकारी अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांचे उंबरठे झिजवले. पण कोणीही आमच्या समस्येकडे लक्ष दिले नाही. दरवर्षी पावसाळ्यात होणारे हाल थांबवण्यासाठी आम्ही स्वतःच रस्त्याचे काम करण्याचे ठरवले. शासनाने फक्त कागदावर योजना चालवण्यापेक्षा प्रत्यक्ष जमिनीवर काम करावे अशी अपेक्षा अकोलादेव येथील शेतकरी दत्तू सांडू सवडे यांनी व्यक्त केली आहे.

**प्रशासकीय यंत्रणेवर प्रश्नचिन्ह**

शेतकऱ्यांनी श्रमदानातून रस्ता पूर्ण केल्याची बातमी परिसरात पसरताच प्रशासकीय वर्तुळात चांगलीच खळबळ उडाली आहे. जर शेतकरी स्वतःच्या हिमतीवर रस्ते बनवू शकतात, तर मग शासनाचा कोट्यवधी रुपयांचा निधी जातो कुठे? आणि पाणंद रस्ते योजनेच्या नावाखाली होणारा खर्च नेमका कोणाच्या खिशात जातो? असा संतप्त सवाल आता नागरिक विचारत आहेत. अकोलादेवच्या शेतकऱ्यांनी घेतलेला हा निर्णय इतर गावांना दिशा देणारा अ देणारा असला, तरी तो सरकारच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालणारा ठरला आहे.

टाकून अत्यंत कमी वेळात हा ३ किलोमीटरचा पानंद रस्ता वहिवाटीसाठी योग्य केला. अकोलादेव येथील शेतकऱ्यांनी एकीचे बळ दाखवत तीन किलोमिटर लांबीचा पाणंद रस्ता तयार करुन प्रशासनाच्या डोळ्यात अंजन घातले आहे.

## आयसीआयसीआय...

महत्त्वाचा संदेश मिळतो की, बँकांनी त्यांच्या खात्यांवर लियन लावताना योग्य प्रक्रिया आणि नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. कोणत्याही ठोस पुराव्याशिवाय किंवा ग्राहकाला योग्य माहिती दिल्याशिवाय बँकेने मनमानी पद्धतीने कारवाई करणे हे कायद्याच्या विरोधात आहे. ग्राहकांनी आपल्या हक्कांबाबत जागरूक असले पाहिजे आणि बँकांच्या अशा मनमानी कृतींविरुद्ध ग्राहक आयोगाकडे दाद मागण्यास अजिबात कचरू नये. तसेच, बँकांसाठी हा एक धडा आहे की, केवळ अंतर्गत मार्गदर्शक तत्त्वांच्या आधारावर ग्राहकांना त्रास देऊ नये, तर प्रत्येक कारवाईला कायदेशीर आणि कागदोपत्री समर्थन असणे आवश्यक आहे.

## शिवसेना उपनेते...

मनपा विरोधी पक्षनेते कमलेश खरे, नगरसेवक दीपक राठोड, नगरसेवक दिनेश भगत, नगरसेवक दुर्गेश कठोडीवाले, सिद्धार्थ आवारे, ॲड. आशीष डोंगले, दिलीप डोंगरे, विजय मिसाळ, विश्वनाथ शिरसागर, गणेश लोखंडे, ईश्वर बिडवे यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दूषित पाण्यामुळे...

आहे. त्यामुळे गंभीर समस्या निर्माण झाल्यानंतर आहेत, तरीही नागरिकांना वेळेवर प्रतिसाद मिळत नसल्याची तक्रार आहे. ग्रामस्थांनी सांगितले की,कॉईन बॉक्स दुरुस्त करण्याबाबत विचारणा केली असता, ''आता सलग तीन दिवस सुट्ट्या आहेत. त्यानंतर कार्यालयीन वेळेत पाहू,'' असे बेजबाबदार उत्तर संबंधित कर्मचाऱ्यांकडून देण्यात आले. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित गंभीर प्रश्नावर अशी भूमिका घेतल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. दूषित पाण्यामुळे लहान मुले,ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असून अतिसार,पोटदुखी,उलट्या,ताप यांसारख्या आजारांचा प्रादुर्भाव वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. अशा परिस्थितीत प्रशासनाने तातडीने पाणी शुद्धीकरण यंत्रणा व कॉईन बॉक्स सुरू करून सुरक्षित पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

दरम्यान, ग्रामस्थांनी असा सवाल उपस्थित केला आहे की,''दूषित पाण्यामुळे गावात रोगराई पसरल्यास त्याला जबाबदार कोण? मुख्यालयी अनुपस्थित राहून कारभार करणाऱ्या ग्रामसेवकांवर व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई होणार का?' ग्रामस्थांनी जिल्हा परिषद,गटविकास अधिकारी आणि संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची तातडीने चौकशी करून निष्काळजी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी तसेच नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी केली आहे.दरम्यान, हा असा प्रकार जाफ्राबाद तालुक्यातील सर्वच गावांमध्ये असून कधी गटविकास अधिकारी नसणे, कधी प्रभारी गटविकास अधिकारी असणे, आणि आहे ते गटविकास अधिकारी कामाचा व्याप जास्त असल्याचे कारण सांगून ग्रामसेवक लोकांना पाठीशी घालत असल्याचा प्रकार या निमित्ताने समोर येतोय.

# जालना महापालिकेत शिस्तभंग; चार नगरसेवकांना महापौरांची कारणे दाखवा नोटीस

## सर्वसाधारण सभेतील बेशिस्त व आक्षेपार्ह वर्तनाची गंभीर दखल; २४ तासांत खुलासा सादर करण्याचे आदेश, अन्यथा पुढील कारवाईचा इशारा






**जालना । प्रतिनिधी**

जालना शहर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत झालेल्या गदारोळानंतर आता महापालिका प्रशासनाने शिस्तभंगाच्या मुद्द्यावर कठोर भूमिका घेतली आहे. महापौर वंदना मगरे यांनी सभागृहातील शिस्तभंग, आक्षेपार्ह वर्तन आणि आचारसंहितेच्या उल्लंघनाची गंभीर दखल घेत चार नगरसेवकांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. या कारवाईमुळे जालना महापालिकेच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, आगामी काळात या प्रकरणाचे पडसाद उमटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

महापौरांनी महिला व बालकल्याण समितीच्या सभापती संध्या देठे, भाजपचे नगरसेवक विरेंद्र धोका, शिवसेनेचे नगरसेवक निखिल पगारे आणि अपक्ष नगरसेवक श्रीकांत पांगारकर यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ड नियम २ अंतर्गत कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. १४ जुलैच्या सर्वसाधारण सभेतील घटनांवर कारवाई १४ जुलै रोजी झालेल्या महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत अनेक विषयांवरून वातावरण चांगलेच तापले होते. भीम पार्क, विपश्यना केंद्र, पाणीपुरवठा, स्वच्छता, अतिक्रमण, पीआर कार्ड, जीएसटी अनुदान, मोकाट जनावरे, पिंक टॉयलेट आदी विषयांवर जोरदार चर्चा झाली होती. या चर्चेदरम्यान काही सदस्यांनी सभागृहातील शिस्त मोडल्याचा आरोप करण्यात आला होता.

महापौरांनी बजावलेल्या नोटिशीनुसार संबंधित नगरसेवकांनी अध्यक्षीय परवानगी न घेता वारंवार बोलणे, सभागृहाच्या कामकाजात अडथळे निर्माण करणे, आक्षेपार्ह भाषा वापरणे आणि सभागृहाच्या नियमांचे उल्लंघन करणे, अशा प्रकारचे वर्तन केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. २४ तासांत लेखी खुलासा देण्याचे आदेश महापौरांनी संबंधित चारही नगरसेवकांना नोटीस प्राप्त झाल्यानंतर २४ तासांच्या आत लेखी खुलासा सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. संबंधितांचे स्पष्टीकरण समाधानकारक न आल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार पुढील शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा नोटिशीत देण्यात आला आहे.

महापालिका प्रशासनाने या कारवाईत सभागृहाची प्रतिष्ठा, नियमांचे पालन आणि लोकप्रतिनिधींच्या आचारसंहितेचे महत्त्व अधोरेखित केले आहे.

महापालिकेच्या इतिहासातील दुर्मीळ कारवाई जालना महानगरपालिकेच्या इतिहासात सर्वसाधारण सभेतील वर्तनावर लोकप्रतिनिधींना अशा स्वरूपाची कारणे दाखवा नोटीस बजावण्याची घटना अत्यंत दुर्मीळ मानली जात आहे. त्यामुळे या कारवाईची राजकीय आणि प्रशासकीय स्तरावर मोठी चर्चा सुरू झाली आहे.

काहींच्या मते सभागृहातील शिस्त राखण्यासाठी हा आवश्यक निर्णय आहे, तर विरोधी गटाकडून या कारवाईमागे राजकीय हेतू असल्याचा आरोप होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

आचारसंहितेच्या अंमलबजावणीवर भर महापालिका सभागृह हे लोकशाही चर्चेचे व्यासपीठ असून, तेथील प्रत्येक सदस्याने सभागृहाचे नियम, अध्यक्षीय आदेश आणि आचारसंहितेचे पालन करणे अपेक्षित असते. याच पार्श्वभूमीवर महापौरांनी घेतलेल्या या निर्णयामुळे भविष्यात सभागृहातील कामकाज अधिक शिस्तबद्ध ठेवण्याचा प्रयत्न असल्याचे बोलले जात आहे. राजकीय घडामोडींना वेग

चार नगरसेवकांना बजावण्यात आलेल्या नोटिशींनंतर संबंधित सदस्य कोणता खुलासा सादर करतात, महापौर त्यावर काय निर्णय घेतात आणि पुढे शिस्तभंगाची कारवाई होते. का, याकडे आता संपूर्ण जालना शहराचे लक्ष लागले आहे. विशेष म्हणजे, नुकत्याच पार पडलेल्या सर्वसाधारण सभेत झालेल्या वादानंतर ही कारवाई झाल्याने महापालिकेतील सत्ताधारी आणि विरोधकांमधील संघर्ष आणखी तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

---

## महापौरांनी फक्त नोटीस देऊन थांबू नये, पुढील कारवाई करा – ॲड. महेश धन्नावत

**जालना- प्रतिनिधी**

जालना महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत झालेल्या गोंधळ आणि नगरसेवकांच्या गैरवर्तनप्रकरणी महापौर वंदना मगरे यांनी सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील नगरसेवकांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. सभेचे थेट प्रक्षेपण असल्याने नागरिकांनी नगरसेवकांचे वर्तन थेट पाहिले.

**या प्रकरणावर भाष्य करताना ॲड. महेश धन्नावत म्हणाले,** ''महापौर वंदना मगरे यांनी नोटीस देऊन योग्य सुरुवात केली आहे. मात्र येथेच थांबून चालणार नाही. सभागृहाची प्रतिष्ठा धुळीस मिळवणाऱ्या नगरसेवकांवर कठोर आणि दाखलपात्र कारवाई करणे आवश्यक आहे. कारणे दाखवा नोटीस हा फक्त पहिला टप्पा आहे, पुढील प्रक्रिया तातडीने राबवली पाहिजे. ते पुढे म्हणाले, ''जेव्हा महापौरपदी एक महिला आहे, तेव्हा नगरसेवकांनी अधिक सजग राहून नैतिकतेने वागणे अपेक्षित आहे. सभागृह हे जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी आहे, वैयक्तिक हेवेदावे आणि आरडाओरडा करण्यासाठी नाही. असे वर्तन शहराच्या प्रतिमेला काळिमा लावणारे आहे. सभेचे ऑनलाइन प्रक्षेपण असल्यामुळे शाळा-कॉलेजमधील तरुण-तरुणी आणि महिलांनी देखील हे सर्व पाहिले. याबत ॲड. धन्नावत म्हणाले, ''*लोकप्रतिनिधींचे हे वर्तन पाहून तरुण पिढी आणि महिलांच्या मनात काय विचार आला असेल? आपण ज्यांना निवडून देतो ते असेच वागतात का, असा प्रश्न त्यांना पडला असेल. हा लोकशाहीसाठी आणि शहरासाठी अत्यंत लज्जास्पद प्रकार आहे. महापालिकेच्या कामकाजात शिस्त आणण्यासाठी केवळ नोटीस पुरेशी नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. ''निलंबन, विशेषाधिकार भंगाची कारवाई अशा पुढील पावलांवर महापौरांनी विचार करावा. अन्यथा अशा नोटीसांचा कोणताही धाक राहणार नाही आणि भविष्यात पुन्हा असेच प्रकार घडतील,'' असे ॲड. धन्नावत यांनी सांगितले. नगरसेवकांनी आपापसातील मतभेद बाजूला ठेवून जालना शहरातील पाणी, रस्ते, आरोग्य आणि स्वच्छतेसारख्या मूलभूत प्रश्नांवर लक्ष केंद्रित करावे, असे आवाहन त्यांनी केले. शेवटी ते म्हणाले, ''जनतेने मोठ्या अपेक्षेने नगरसेवकांना निवडून दिले आहे.

---

## राष्ट्रीय कराटे स्पर्धेसाठी जालनाचे कराटे खेळाडू दिल्लीला रवाना

**जालना - प्रतिनिधी**

स्टेअर्स युथ गेम्स, राष्ट्रीय कराटे स्पर्धा २०२५-२६ तालकटोरा इंटरनॅशनल स्टेडियम दिल्ली येथे दिनांक २३ व २४ जुलै २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेली आहे.

या राष्ट्रीय कराटे स्पर्धेत महाराष्ट्र टीमचे टीम मॅनेजर म्हणून जालन्याचे सेन्साई रुपेन्द्र गोपाल पारचा यांची नियुक्ती करण्यात आली.

तसेच या स्टेअर्स युथ गेम्स राष्ट्रीय कराटे स्पर्धेत जालना जिल्ह्याचे १५ कराटे खेळाडूंची निवड सुद्धा झाली आहे.

दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत जालना जिल्ह्यातून महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणारे खेळाडू खालील प्रमाणे आहे.




कु. निवांशी नवीनकुमार वलकट्टी ( नारायणा ई-टेक्नो स्कूल जालना), कु. अनुष्का किशोर म्हेत्रे ( नवयुवक गणेश माध्यमिक विद्यालय, जालना), कु. तन्वी नितीन खरटमल ( राजश्री शाहू इंग्लिश स्कूल जालना), कु. आरुषी नवीनकुमार वलकट्टी ( नारायणा इ - टेक्नो स्कूल जालना), कु. वैष्णवी बाबासाहेब लोखंडे( पोद्दार इंटरनॅशनल स्कूल जालना), कु. आकांक्षा शंकर चिल्का (श्री म स्था जैन विद्यालय जालना), कु. वैष्णवी संतोष लुटे( राष्ट्रीय हिंदी विद्यालय इंग्लिश मीडियम जालना ) कु. दिव्यता अजित राज कोठारी (श्री म स्था जैन इंग्लिश स्कूल जालना), कु. लावण्या किशोर गुडला ( कॉलेज जालना), कु. पूर्वा सुजित माने ( श्रीमती इंद्रा गांधी कॉलेज रामनगर जालना) , ऋषिकेश गणेश श्रीराम ( नारायणा ई- टेक्नो स्कूल जालना) , यशवर्धन शंकर चिल्का (श्री म स्था जैन इंग्लिश स्कूल, जालना), नयन धनराज गोमतीवाले(. . कॉलेज जालना), शेलमॉन योहान गुडेकर (कॉलेज जालना), ओंकार गुट्टे (कॉलेज,जालना या विद्यार्थ्यांना जालना जिल्ह्याचे चीफ कॉर्डिनेटर सेन्साई रूपेन्द्र पारचा व प्रशिक्षक सेन्साई अमन पारचा यांचे मार्गदर्शन लाभले

स्टेअर्स जालना जिल्ह्याचे अध्यक्ष श्री दीपक जी शेळके, उपाध्यक्ष श्री गणेश श्रीराम, उपाध्यक्ष प्रशांत प्रेम भारती, जालना जिल्ह्याचे उपमहापौर श्री राजेश जी राऊत, नगरसेवक महावीरजी ढक्का, राहुलजी मांडोत सर, श्री संजयजी भगत,रितेशजी अग्रवाल, श्री म स्था जैन इंग्लिश शाळेची मुख्याध्यापिका श्रीमती कुलकर्णी मॅडम,श्री म स्था जैन विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री वान्गोता सर, श्री म स्था जैन प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती पोरवाल मॅडम, नारायणा ई टेक्नो स्कूल ची मुख्याध्यापिका जॉन वेसली मॅडम , श्री व्यंकट राजू गुडला,श्री यादवजी बापू सर, श्री आशिष उपाध्याय सर,श्री रितेशजी जयस्वाल, व पालक वर्ग यांनी कौतुक करून पुढच्या वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

---

## वेद रायगडाचा महाराष्ट्राचे प्रांत उपाध्यक्ष, प्राध्यापक दत्ता देशमुख यांचा सेवानिवृत्ती निमित्त, इतिहास प्रबोधन संस्था व वेद रायगडाचा प्रतिष्ठान महाराष्ट्रातर्फे सत्कार

**दत्ता देशमुख**



टेंभुर्णी तालुका जाफराबाद जिल्हा जालना येथील, नवभारत कनिष्ठ महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राध्यापक, वेद रायगडाचा प्रतिष्ठान महाराष्ट्राचे प्रांत उपाध्यक्ष तसेच इतिहास प्रबोधन संस्थेचे २५ -२६ या वर्षाचे अध्यक्ष प्राध्यापक दत्ता देशमुख टेंभुर्णीकर यांचा इतिहास प्रबोधन संस्था व वेद रायगडाचा प्रतिष्ठान महाराष्ट्र, तसेच इतिहासासंदर्भामधील सर्व अंतर्गत संस्था तर्फे सेवानिवृत्ती निमित्त नुकताच सत्कार करण्यात आला. याप्रसंगी वेद रायगडाच्या प्रतिष्ठान महाराष्ट्राचे सर्वेसर्वा डॉक्टर रवींद्र पाटील, वेद रायगडाच्या प्रतिष्ठान महाराष्ट्राचे सचिव भारतीताई साठे, इतिहास प्रबोधन संस्थेच्या वतीने सुद्धा संस्थेच्या सचिव भारतीयतेसाठी यांनी त्यांचा सत्कार केला. सत्कार प्रसंगी बोलताना डॉक्टर रवींद्र पाटील म्हणाले प्राध्यापक दत्ता देशमुख यांचा कार्य वेळ रायगडाचे प्रतिष्ठान महाराष्ट्र तसेच, शिवचरित्र पुष्पांजली निमित्त, याच प्रबोधन संस्थेचे सामाजिक कार्य, पहिले विश्व शिवचरित्र साहित्य संमेलन त्यांच्यासाठी योगदान महत्त्वाचे ठरले. त्याचबरोबर याप्रसंगी डॉक्टर रवींद्र पाटील, प्रसिद्ध चित्रकार संतोष बाबुराव आवटी, भारतीताई साठे यांनी त्यांचा कार्याचा गौरव गार केले. त्यांचं तळागाळातील कार्य अत्यंत महत्त्वाचा आहे असे सुद्धा सांगितले. या सत्कारासाठी ते जळगाव या मुख्यालय हून टेंभुर्णी येथे आवर्जून उपस्थित राहिले. भारतीताई साठे यांनी सुद्धा सत्कार प्रसंगी गौरव उद्गार काढले. या तिन्ही संस्थांच्या वतीने व अंतर्गत संस्थांच्या वतीने सर्व सदस्यांच्या शुभेच्छा सुद्धा याप्रसंगी त्यांना दिल्या. सेवानिवृत्तीनंतर या सर्व संस्थांचा कारभार व कार्य त्यांना आता अत्यंत जोमाने करता येईल असे त्यांनी याप्रसंगी भावना व्यक्त केल्या. याप्रसंगी सत्काराला उत्तर देताना भावना वेळेस होऊन प्राध्यापक दत्ता देशमुख यांनी सुद्धा आपले विचार मांडले. सत्कार केल्याबद्दल धन्यवाद व आभार सुद्धा मानले. याप्रसंगी स्वामी विवेकानंद पतसंस्थेच्या मॅनेजर रेवती आवटी यांची उपस्थिती होती.

---

दैनिक युवा आदर्श दि. २१-०७-२०२६

CHANGE IN NAME

I have Change My name From
Old Name
**Usmankha Pathan**
New Name
**Usmankha Razzaqkha Pathan**
As per my Documents
Address:- Ho.No.1-30-453, Balaji Galli
Opp. Aqsa Masjid Gandhi Nagar Jalna
Affidavit No. 77AB 752038

दैनिक युवा आदर्श दि. २१-०७-२०२६

CHANGE IN NAME

I have Change My name From
Old Name
**Taherabi Pathan**
New Name
**Taherabi Usmankha Pathan**
As per my Documents
Address:- Near Aqsa Masjid Balaji Galli
Jalna Affidavit No. 77AB 752034

---

## निसर्गाची अवकृपा की मानवाची चूक?

हल्ली एक वाक्य सर्वांच्या तोंडी ऐकायला मिळते''माणसांप्रमाणे निसर्गही बदलला आहे.'' हे वाक्य आजच्या परिस्थितीत तंतोतंत खरे वाटते. ऋतूंचे चक्र विस्कळीत झाले आहे. उन्हाळा अधिक तापदायक, हिवाळा अनियमित आणि पावसाळा पूर्णपणे बेभरवशाचा झाला आहे. त्यामुळे निसर्गाचा लहरीपणा दिवसेंदिवस वाढत असून त्याचे गंभीर परिणाम संपूर्ण जगाला भोगावे लागत आहेत.

पूर्वी हवामानाचा काहीसा निश्चित क्रम होता. जूनमध्ये पावसाची सुरुवात, ऑक्टोबरनंतर हिवाळ्याची चाहूल आणि मार्चपासून उन्हाळा असे ऋतुचक्र ठरलेले असे. परंतु आता कोणताही ऋतू वेळेवर सुरू होत नाही. जूनमध्ये पडणारा पाऊस उशिरा येतो, काही दिवस प्रचंड मुसळधार कोसळतो आणि त्यानंतर अनेक दिवस गायब होतो. दोन-तीन दिवसांत दोन महिन्यांच्या पावसाची सरासरी पूर्ण होते, तर पुढील अनेक दिवस कोरडे जातात. अशा असंतुलित पावसामुळे पूर, दरडी कोसळणे, पिकांचे नुकसान आणि जनजीवन विस्कळीत होणे ही नित्याची बाब झाली आहे.

पावसाळ्याप्रमाणेच उन्हाळाही अधिक तीव्र झाला आहे. अनेक भागांत तापमान ४० अंश सेल्सिअसच्या पुढे जात आहे. हिवाळाही पूर्वीसारखा राहिलेला नाही. थंडीचा कालावधी कमी झाला असून वातावरणात सतत अनिश्चितता निर्माण झाली आहे. हवामान खात्यालाही अचूक अंदाज वर्तविणे दिवसेंदिवस अधिक कठीण होत आहे. हे बदल केवळ भारतापुरते मर्यादित नसून संपूर्ण जगासमोर उभे राहिलेले गंभीर संकट आहे.

या परिस्थितीसाठी ग्लोबल वॉर्मिंग हे महत्त्वाचे कारण मानले जाते. पृथ्वीच्या सरासरी तापमानात सातत्याने वाढ होत असल्यामुळे हवामानाचे संतुलन बिघडत आहे. जागतिक हवामान तज्ज्ञांनीही भविष्यात ही समस्या अधिक गंभीर होण्याचा इशारा दिला आहे. मात्र यासाठी केवळ ग्लोबल वॉर्मिंगला दोष देऊन चालणार नाही. त्यामागे मानवी हस्तक्षेप आणि पर्यावरणाचा झालेला ऱ्हास हे तितकेच मोठे कारण आहे.

मानवाने विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर जंगलतोड केली, काँक्रीटची जंगले उभारली, औद्योगिकीकरणामुळे कार्बन उत्सर्जन वाढविले, वाहनांची संख्या वाढल्याने प्रदूषणात मोठी भर पडली आणि नद्या, नाले, तलाव व जलस्रोतांवर अतिक्रमण केले. नैसर्गिक संसाधनांचा बेसुमार वापर करून पर्यावरणाचे संतुलन बिघडविण्यात आले. परिणामी पृथ्वीचे तापमान वाढले आणि हवामानातील अनिश्चितता अधिक तीव्र झाली.

या बदलांचा सर्वाधिक फटका भारतातील शेतकऱ्यांना बसत आहे. भारत हा कृषिप्रधान देश असून मोठी लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. अवकाळी पाऊस, गारपीट, चक्रीवादळे, पूर, कोरडा व ओला दुष्काळ यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान होत आहे. शेती दिवसेंदिवस तोट्याची ठरत असल्याने अनेक तरुण गाव सोडून शहरांकडे स्थलांतर करत आहेत. त्यामुळे ग्रामीण भाग ओस पडत असून शहरांवरील लोकसंख्येचा ताण वाढत आहे.

हवामान बदलाचा परिणाम केवळ शेतीपुरता मर्यादित नाही. मानवाच्या आरोग्यावरही त्याचे गंभीर परिणाम दिसून येत आहेत. श्वसनाचे विकार, उष्माघात, संसर्गजन्य आजार आणि इतर अनेक आरोग्यविषयक समस्या वाढत आहेत. पशुपक्षी, वन्यजीव आणि जैवविविधतेलाही या बदलांचा मोठा फटका बसत आहे. अनेक प्रजातींचे अस्तित्व धोक्यात आले असून संपूर्ण जीवसृष्टीच या संकटाचा सामना करत आहे.

निसर्ग हा मानवाचा शत्रू नाही; तो आपल्या अस्तित्वाचा आधार आहे. परंतु मानवाने स्वार्थापोटी निसर्गाचा समतोल बिघडविल्यामुळे आज निसर्गाचे रौद्र रूप अनुभवावे लागत आहे. त्यामुळे पर्यावरण संरक्षण ही केवळ सरकारची नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन, जलसंधारण, प्रदूषणावर नियंत्रण, प्लास्टिकचा कमी वापर, अक्षय ऊर्जेचा स्वीकार आणि नैसर्गिक संसाधनांचा संयमाने वापर ही काळाची गरज आहे.

आज निसर्ग सूड घेत नाही, तर आपल्या कृतींचे परिणाम आपल्यालाच दाखवत आहे. त्यामुळे विकास आणि पर्यावरण यांच्यात समतोल राखणे हीच खरी शाश्वत प्रगती ठरेल. जर आजही आपण हवामान बदलाच्या संकटाकडे गांभीर्याने पाहिले नाही, तर भविष्यात त्याची किंमत केवळ मानवालाच नव्हे, तर संपूर्ण जीवसृष्टीला मोजावी लागेल. आज पर्यावरणाचे संरक्षण केले, तर उद्या पर्यावरण आपले संरक्षण करेल; अन्यथा निसर्गाची अवकृपा ही येणाऱ्या पिढ्यांसाठी विनाशाची शोकांतिका ठरेल.

**श्याम ठाणेदार**
**दौंड, जि. पुणे**

# आयसीआयसीआय बँकेला ग्राहक आयोगाचा दणका: मनमानी पद्धतीने खात्यावर लियन लावणे सेवाभावात कमतरता

**जालना -प्रतिनिधी**

कैथल जिल्हा ग्राहक वाद निवारण आयोगाने आयसीआयसीआय बँकेला सेवेतील कमतरता आणि अनुचित व्यापार पद्धतीसाठी जबाबदार धरले आहे. आयोगाने निर्णय दिला की, बँकेने कोणत्याही योग्य प्रक्रियेचे पालन न करता आणि कथित फसवणुकीच्या वादाला पुष्टी देणारी कोणतीही सामग्री सादर न करता, तक्रारदार शैला सिक्का यांच्या बचत खात्यावर मनमानी पद्धतीने लियन () लावला. आयोगाने बँकेला तात्काळ लियन काढण्याचे आणि तक्रारदाराला नुकसान भरपाई देण्याचे आदेश दिले आहेत.

तक्रारदार, शैला सिक्का, यांचे आयसीआयसीआय बँकेत बचत खाते होते. दिनांक १२ डिसेंबर २०२५ रोजी, वैद्यकीय खर्चासाठी व्यवहार करण्याचा प्रयत्न केला असता, तो अयशस्वी झाला. त्यांनी आपल्या खात्याची तपासणी केली असता, त्यांना आढळले की त्यांच्या खात्यावर लियन लावण्यात आला होता, ज्यामुळे उपलब्ध शिल्लक रक्कम ₹१४,१४,००६.८२ वरून ₹२,७५,९९३.१८ पर्यंत कमी झाली होती. त्यांनी दिनांक १५ डिसेंबर २०२५ रोजी बँकेच्या शाखेत जाऊन स्पष्टीकरण मागितले आणि लियन काढण्याची विनंती केली. बँक अधिकाऱ्यांनी त्यांना सांगितले की, कथित फसवणुकीच्या वादामुळे खात्यावर लियन लावण्यात आला आहे आणि तो केवळ बँकेची बॅकेन्ड टीमच काढू शकते. लियनचे कारण विचारण्यासाठी आणि कोणती एफआयआर किंवा पोलीस तक्रार दाखल केली आहे का, हे जाणून घेण्यासाठी शाखेला भेट देऊन आणि ईमेल पाठवूनही त्यांना समाधानकारक प्रतिसाद मिळाला नाही. यामुळे त्यांनी कैथल जिल्हा ग्राहक वाद निवारण आयोगाकडे धाव घेतली.

आयसीआयसीआय बँकेने आपल्या बचावात म्हटले की, अंतर्गत प्रक्रिया आणि मार्गदर्शक तत्त्वांनुसार लियन एक खबरदारीचा उपाय म्हणून लावला होता. बँकेने सादर केले की, दिनांक २३ नोव्हेंबर २०२५ रोजी, शिल्पा विज नावाच्या एका व्यक्तीने, जी तक्रारदाराची बहीण असल्याचे सांगितले जाते, एनईएफटीद्वारे ₹३४,९०,००० ची रक्कम तक्रारदाराच्या खात्यात हस्तांतरित केली होती. बँकेनुसार, नंतर हस्तांतरण करणाऱ्याने ग्राहक सेवेद्वारे या व्यवहारावर वाद उपस्थित केला, त्यानंतर बँकेने पडताळणी प्रलंबित असताना वादग्रस्त रकमेवर लियन लावला. बँकेने पुढे म्हटले की, हस्तांतरण करणाऱ्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला आणि वादग्रस्त निधी सुरक्षित ठेवण्यासाठी लियन आवश्यक होता.

आयोगाने असे निरीक्षण नोंदवले की, बँकेने आपल्या बचावासाठी कोणतीही कागदोपत्री पुरावे सादर करण्यात अपयश आले. जरी बँकेने दावा केला की हस्तांतरण करणाऱ्याने ग्राहक सेवेद्वारे व्यवहारावर वाद उपस्थित केला होता, तरी या दाव्याला समर्थन देण्यासाठी कोणतीही तक्रार नोंद, संवाद, कॉल तपशील किंवा इतर सामग्री सादर केली नाही. त्याचप्रमाणे, बँकेने दावा केल्याप्रमाणे हस्तांतरण करणाऱ्याशी संपर्क साधला होता किंवा कोणतीही पडताळणी केली होती, हे सिद्ध करण्यात बँक अपयशी ठरली. आयोगाने असेही निरीक्षण नोंदवले की, लियनला न्याय देण्यासाठी अंतर्गत मार्गदर्शक तत्त्वांवर अवलंबून असतानाही, बँकेने ती मार्गदर्शक तत्त्वे रेकॉर्डवर ठेवली नाहीत. बँकेने वादग्रस्त व्यवहाराशी संबंधित कोणतीही एफआयआर, पोलीस तक्रार, सायबर गुन्हे तक्रार किंवा तपास अहवाल सादर केला नाही.

बँकेच्या कथित अंतर्गत तपासावरील अवलंबित्व नाकारताना, आयोगाने निरीक्षण नोंदवले की, बँक वैधानिक तपासणी एजन्सीची भूमिका घेऊ शकत नाही आणि अशा दाव्यांना पुराव्यांनी समर्थन देणे आवश्यक आहे. रेकॉर्डवर ठेवलेल्या आरबीआय परिपत्रकांचा संदर्भ देत, आयोगाने निरीक्षण नोंदवले की, बँकेने लागू नियामक चौकटीचे पालन केल्याचे दर्शवणारी कोणतीही सामग्री सादर केली नाही. आयोगाने तक्रारदाराच्या या दाव्यातही तथ्य आढळले की, तिला लियनच्या कारणांबद्दल योग्य प्रकारे माहिती दिली गेली नव्हती आणि बँकेने ही कारवाई स्पष्ट करणारा कोणताही संवाद तिला पाठवला होता, हे सिद्ध करण्यात बँक अपयशी ठरली. बँक खाती मनमानी पद्धतीने गोठवण्याशी संबंधित पूर्वीच्या निर्णयांवर अवलंबून राहून, आयोगाने असे मानले की बँकेने योग्य प्रक्रियेचे पालन न करता आणि कोणत्याही सहाय्यक तक्रारी किंवा तपासाशिवाय लियन लावला होता. बँकेचे हे कृत्य सेवेतील कमतरता तसेच अनुचित व्यापार पद्धती असल्याचे आयोगाने निष्कर्ष काढला, ज्यामुळे तक्रारदाराला आर्थिक नुकसान, गैरसोय आणि मानसिक त्रास झाला.

तक्रार मंजूर करताना, आयोगाने विरोधी पक्षांना संयुक्तपणे आणि स्वतंत्रपणे तक्रारदाराच्या बचत खात्यावर लावलेला लियन तात्काळ काढण्याचे निर्देश दिले. आयोगाने मानसिक त्रास आणि छळासाठी ₹१५,००० आणि खटल्याच्या खर्चासाठी ₹५,००० नुकसान भरपाई म्हणून मंजूर केले. ही रक्कम ४५ दिवसांच्या आत देण्याचे निर्देश दिले असून, तसे न केल्यास आदेशाच्या तारखेपासून वास्तविक वसुली होईपर्यंत वार्षिक ७% दराने व्याज लागेल. या प्रकरणाचे शीर्षक शैला सिक्का विरुद्ध आयसीआयसीआय बँक व अन्य असे असून, त्याचा क्रमांक ग्राहक तक्रार क्र. ०३ ऑफ २०२६ आहे.

या प्रकरणातून शिकण्यासारखे काय आहे, यावर बोलताना, ॲड. महेश एस. धन्नावत म्हणाले, ''या निर्णयामुळे ग्राहकांना एक *(पान २ वर)*

## अनुसूचित जाती उपवर्गीकरण (अ, ब, क, ड) विरोधी महामोर्चा चर्मकार समाजासह अनुसूचित जाती प्रवर्गातील सर्व समाजबांधवांना मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन

**जालना - प्रतिनिधी**

भारतीय राज्यघटनेतील स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांवर दृढ विश्वास ठेवून दिनांक २१ जुलै २०२६ (मंगळवार) रोजी सकाळी ११.०० वाजता जालना येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, मस्तगड येथून जिल्हाधिकारी कार्यालय, जालना पर्यंत ''अनुसूचित जाती उपवर्गीकरण (अ, ब, क, ड) विरोधी महामोर्चा'' आयोजित करण्यात आला आहे. या महामोर्चामध्ये चर्मकार समाजासह अनुसूचित जाती () प्रवर्गातील सर्व जाती-जमातींचे माता, बंधू, भगिनी, युवक-युवती, विद्यार्थी, कर्मचारी, कामगार, शेतकरी, उद्योजक, व्यावसायिक, निवृत्त कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते, विविध सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक संस्था, संघटना तसेच सर्व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते राहुल सत्यनारायणजी करनाडे यांनी केले आहे.हा महामोर्चा पूर्णपणे शांततापूर्ण, संविधानिक आणि लोकशाही मार्गाने आयोजित करण्यात येत असून, सहभागी होणाऱ्या प्रत्येकाने कायद्याचे पालन, सामाजिक सलोखा, शिस्त आणि बंधुता जपत सहभाग नोंदवावा, असेही त्यांनी नमूद केले.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेद्वारे दिलेल्या सामाजिक न्याय, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांचे जतन करणे ही प्रत्येक



नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. समाजातील विविध घटकांमध्ये ऐक्य, परस्पर विश्वास आणि सामाजिक एकात्मता अधिक दृढ व्हावी, या भावनेतून सर्वांनी संविधानिक मार्गाने आयोजित या महामोर्चात सहभागी व्हावे. जालना जिल्ह्यातील प्रत्येक गाव, वाडी-वस्ती, शहर तसेच ग्रामीण व शहरी भागातील चर्मकार समाजासह अनुसूचित जाती () प्रवर्गातील सर्व समाजबांधवांनी कोणतेही मतभेद, गटबाजी किंवा वैचारिक भिन्नता बाजूला ठेवून एकजुटीने या महामोर्चात सहभागी व्हावे. समाजाची खरी ताकद ही त्याच्या संघटनात, एकतेत आणि संविधानावरील निष्ठेमध्ये आहे. सर्वांनी वेळेचे पालन करून दि. २१ जुलै २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, मस्तगड, जालना येथे उपस्थित राहून संविधानिक मूल्यांच्या अधीन राहून शांततापूर्ण पद्धतीने आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ता राहुल सत्यनारायणजी करनाडे यांनी केले आहे.

## शिवसेना उपनेते तथा आ. अर्जुनर खोतकर यांच्या हस्ते 'आयुष्यमान आरोग्य शिबिराचे' उद्घाटन

**जालना - प्रतिनिधी**

जालना शहरातील कन्हैयानगर येथील आयुष्यमान आरोग्य मंदिर येथे आयोजित करण्यात आलेल्या आयुष्यमान आरोग्य शिबिराचे उद्घाटन शिवसेना उपनेते तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम, जिल्हा क्षयरोग केंद्र, जालना तसेच महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या संयुक्त विद्यमाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना शिवसेना उपनेते तथा आमदार अर्जुनराव खोतकर म्हणाले की, ''सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या परिसरातच दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध



करून देणे ही काळाची गरज आहे. अशा आरोग्य शिबिरांमुळे नागरिकांना वेळेवर तपासणी, उपचार आणि विविध आरोग्य योजनांचा लाभ मिळतो. नागरिकांचे आरोग्य सुदृढ राहावे यासाठी शासनाच्या माध्यमातून अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत.''

यापुढे बोलताना त्यांनी जालना शहराच्या सर्वांगीण विकासासाठी निधीची कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नसल्याचे स्पष्ट केले. तसेच सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या माध्यमातून बौद्ध विपश्यना केंद्र भव्य सभागृह उभारणीसाठी सुमारे १३० कोटी रुपयांच्या मंजुरी मिळाल्याचे त्यांनी सांगितले. ही कामे जालना शहराच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि विकासात्मक प्रगतीसाठी महत्त्वाची ठरणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी प्रभाग क्रमांक ०२ चे नगरसेवक दीपक राठोड यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, शिवसेना उपनेते तथा आमदार अर्जुनराव खोतकर हे सातत्याने नागरिकांच्या आरोग्य, विकास आणि जनकल्याणासाठी प्रयत्नशील असून त्यांच्या पाठपुराव्यामुळे जालना शहरासाठी मोठ्या प्रमाणावर विकासनिधी उपलब्ध झाला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक विकासकामांना गती मिळाली असून शहराच्या प्रगतीला नवी दिशा मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या शेवटी प्रभाग क्रमांक २ च्या वतीने शिवसेना उपनेते तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास शिवसेना संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर, शिवसेना जिल्हाध्यक्ष ए. जे. बोराडे *(पान २ वर)*

## दूषित पाण्यामुळे रोगराईचा वाढतोच प्रकोप, ग्रामसेवक मात्र परजिल्ह्यात राहून काढतात झोप!

### उन्हाळ्यात पाणीटंचाईवर बोंब ठोकणारे ग्रामसेवक आता पाणी फिल्टर व कॉईन बॉक्स बंद असल्याचे आणत आहेत सोंग!

**दत्ता देशमुख**

जाफ्राबाद तालुक्यातील खापरखेडा गावात सध्या नागरिकांना दूषित पाण्याचा पुरवठा होत असल्याने विविध साथीच्या आजारांचा धोका वाढला आहे. शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी उभारण्यात आलेला पाणी शुद्धीकरण प्रकल्प व कॉईन बॉक्स अनेक दिवसांपासून बंद असल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली आहे. मात्र याकडे संबंधित ग्रामसेवक आणि ग्रामपंचायत प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने



नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, उन्हाळ्याच्या काळात पाणी टंचाईबाबत वारंवार वरिष्ठ प्रशासनाकडे पाठपुरावा करणारे ग्रामसेवक आता ''लाईट नाही'', ''पाणी फिल्टर बंद आहे'', ''कॉईन बॉक्स खराब आहे'' अशी कारणे पुढे करून जबाबदारी टाळत आहेत. त्यामुळे नागरिकांना दूषित पाणी पिण्याशिवाय पर्याय उरलेला नसल्याचा आरोप होत आहे.

विशेष म्हणजे संबंधित ग्रामसेवक मुख्यालयी न राहता परजिल्ह्यातूनच कारभार पाहत असल्याचाही आरोप ग्रामस्थांनी केला *(पान २ वर)*

## परतूर येथे सिलंबम स्पोर्ट्स असोसिएशनच्या वतीने भव्य सिलंबम स्पर्धा संपन्न

**परतूर -प्रतिनिधी**

परतूर शहरात प्रथमच सिलंबम स्पोर्ट्स असोसिएशनच्या वतीने राज्यस्तरीय सिलंबम क्रीडा स्पर्धेचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. स्पर्धेत विविध जिल्ह्यांतील खेळाडूंनी मोठ्या संख्येने सहभाग घेत उत्कृष्ट कौशल्याचे प्रदर्शन केले. दिवसभर रंगलेल्या रोमांचक सामन्यांमुळे उपस्थित प्रेक्षकांनी खेळाडूंना उत्स्फूर्त दाद दिली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. सत्यानंद कराड, तर प्रमुख पाहुणे म्हणून परतूर नगर परिषदेचे नगराध्यक्ष यांचे प्रतिनिधी म्हणून आकाश राक्षे, परतूर नगर परिषदेचे



नगरसेवक इजरान भाई कुरेशी, उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर रेंगे.डॉ.दत्तात्रय नंद. डॉ.अस्मिता मोरे.प्राध्यापक सोरटे मॅडम, डॉ. नितीन भक्त, कुलभूषण यादव शिलंबन स्पोर्ट असोसिएशन मराठवाडा अध्यक्ष, ढबडवार मॅडम, जालिंदर चव्हाण, दैनिक पत्रकार संजय देशमाने, दैनिक पत्रकार हनुमंत दवंडे, माणिक जैस्वाल कराटे कोच यावेळी उपस्थित होते.हा कार्यक्रम परतूर येथील शिलंबम प्रशिक्षक, रोहित जयस्वाल यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या.

या स्पर्धेत जालना येथील देवगिरी इंग्लिश स्कूल संघाने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला. परतूर येथील विवेकानंद विद्यालयाचे सरदार सर आणि सिलंबम प्रशिक्षक रोहित जैस्वाल यांच्या संघाने द्वितीय क्रमांक मिळविला. तर जालना मिशन नवोदय अकॅडमी संघाने तृतीय क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले.

स्पर्धेतील विजेत्या संघांना आकर्षक ट्रॉफी, पदके व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. नगर परिषद अध्यक्ष यांच्या हस्ते विजेत्या खेळाडूंना मेडल व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी खेळाडूंचे अभिनंदन करत सिलंबमसारख्या पारंपरिक भारतीय युद्धकलेचे जतन व संवर्धन करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सिलंबम स्पोर्ट्स असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी, प्रशिक्षकांनी, पंचांनी, स्वयंसेवकांनी तसेच सहभागी शाळांच्या मुख्याध्यापक व शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. पालक व क्रीडाप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या स्पर्धेमुळे परतूर शहरात सिलंबम या पारंपरिक क्रीडेबाबत विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून भविष्यात अशा स्पर्धांचे नियमित आयोजन करण्याचा संकल्प आयोजकांनी व्यक्त केला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन दैनिक पत्रकार हनुमंत दवंडे यांनी केले.

## टेंभुर्णी येथे इस्कॉन सेंटरच्या वतीने श्री जगन्नाथ रथयात्रा महोत्सव उत्साहात साजरा

**दत्ता देशमुख**

येथील इस्कॉन सेंटरच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री जगन्नाथ रथयात्रा महोत्सव अत्यंत भक्तीमय वातावरणात उत्साहात साजरा करण्यात आला. ''हरे कृष्ण, हरे रामा'' च्या जयघोषाने आणि टाळ-मृदंगाच्या गजराने टेंभुर्णी शहर दुमदुमून गेले होते. या रथयात्रेमध्ये परिसरातील भाविक सहभागी होऊन भगवान जगन्नाथाचे दर्शन घेतले.भव्य रथ आणि आकर्षक सजावटमहोत्सवाचे मुख्य आकर्षण असलेल्या रथाची सजावट करण्यात आली होती



रथामध्ये भगवान जगन्नाथ, बलदेव आणि सुभद्रा माता यांच्या मूर्ती विराजमान होत्या. महोत्सवाच्या सुरुवातीला इस्कॉनच्या मुख्य पुजाऱ्यांच्या हस्ते विशेष महाआरती आणि विधीवत पूजा करण्यात आली. त्यानंतर परंपरेनुसार रथाच्या मार्गावर सोन्याच्या झाडूने रस्ता स्वच्छ करून रथयात्रेला सुरुवात झाली.शहरातून निघाली भव्य मिरवणूकटेंभुर्णी शहरातील प्रमुख मार्गांवरून ही भव्य रथयात्रा फिरवण्यात आली. रथयात्रेच्या मार्गावर ठिकठिकाणी स्थानिक नागरिकांनी आणि विविध मंडळांनी सुंदर रांगोळ्या काढून आणि पुष्पवृष्टी करून रथाचे स्वागत केले. अनेक भाविक स्वतःहून देवाचा रथ ओढण्यासाठी उत्सुक होते. रथ ओढल्याने पुण्य लाभते, या श्रद्धेने अबालवृद्धांनी दोरखंड धरून रथ पुढे नेला. मिरवणुकीत भक्तांनी केलेले पारंपारिक नृत्य आणि कीर्तन सर्वांचे लक्ष वेधून घेत होते.

महाप्रसादाचे वाटपरथयात्रेच्या सांगतेनंतर इस्कॉन सेंटरच्या वतीने सर्व भाविकांसाठी संत सावता मंगल कार्यालय येथे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. नागरिकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

## पावसाच्या उघडिपीनंतर कोळपणीला वेग टेंभुर्णी परिसरातील शिवारे गजबजली

**दत्ता देशमुख**

टेंभुर्णी:गेल्या काही दिवसांत झालेल्या समाधानकारक पावसामुळे टेंभुर्णीसह जाफराबाद तालुक्यातील पिके चांगलीच जोमात आली आहेत. दोन-तीन दिवसांपासून पावसाने विश्रांती घेतल्यामुळे शेतकऱ्यांनी तातडीने शेतात उतरून कोळपणीच्या (डवरणी) कामांना सुरुवात केली आहे. पिकांमधील तण काढून जमीन भुसभुशीत करण्यासाठी शिवारात सध्या शेतकऱ्यांची मोठी लगबग पाहायला मिळत आहे.पिकांच्या



वाढीसाठी कोळपणी महत्त्वाचीचालू खरीप हंगामात कपाशी, सोयाबीन आणि मका या पिकांची वाढ चांगली झाली आहे. मात्र, पिकांसोबत शेतात नको असलेले गवतही मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. हे तण वेळेत नष्ट केले नाही, तर पिकांचे नुकसान होते. त्यामुळे शेतकरी पहाटेपासूनच बैलजोडी घेऊन शेतात कोळपणी करत आहेत. या प्रक्रियेमुळे जमिनीला हवा मिळते आणि पिकांची मुळे मजबूत होऊन पिकांची वाढ दुप्पट वेगाने होते.मजूर टंचाईवर बैलजोडीचा आधारसध्या ग्रामीण भागात शेतीकामांसाठी मोठ्या प्रमाणावर मजूर टंचाई जाणवत आहे. अशा परिस्थितीत ट्रॅक्टरपेक्षा पारंपरिक बैलजोडीच्या साहाय्याने केलेली कोळपणी अधिक फायदेशीर ठरत आहे. पिकांच्या ओळींमधून सुरक्षितपणे कोळपणी करण्यासाठी शेतकरी स्वतः आपल्या कुटुंबासह शेतात राबत आहेत.निसर्गाची अशीच साथ राहिल्यास यंदा तालुक्यात कपाशी आणि सोयाबीनचे बंपर उत्पादन होईल, अशी आशा टेंभुर्णी परिसरातील बळीराजा व्यक्त करत आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.